महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्या
- अंतर्गत सर्व प्रादेशिक मंडळांतील अधिकारी/कर्मचारी
यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीबाबत.....

**महाराष्ट्र शासन**

गृहनिर्माण विभाग,

शासन परिपत्रक, क्रमांक: नियुक्ती-२०१९/प्र.क्र.६९(२)/गृनिभू

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

३ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १७ जुलै, २०१९

वाचा :- १) शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग, क्र.प्रतिनि २१०२/प्र.क्र.४०/प्रशा ३, दि.२१.७.२००३

२) गृहनिर्माण विभागाचे तत्कालिन प्रधान सचिव यांचे अर्धशासकीय पत्र क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.५५/झोपसू,दि.७.९.२०१२

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन १२, दि.१७.१२.२०१६

४) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१० /कार्या.१२,दि.१६.२.२०१८

शासन परिपत्रक :

राज्य शासनाच्या विविध विभाग/विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने वाचा येथील क्रमांक ३ व ४ अनुक्रमे, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.२.२०१८ च्या शासन निर्णयांन्वये जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार विहित केलेल्या पध्दतीने नेमणुका करण्याची दक्षता घेण्याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला शासनस्तरावरुन वारंवार कळविण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे गृहनिर्माण विभागाच्या अधिपत्याखालील म्हाडाच्या क्षेत्रीय कार्यालयात नियुक्ती/बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना परस्पर म्हाडामध्ये रुजू किंवा कार्यमुक्त करण्यात येऊ नये याबाबतचे निर्देश वाचा येथील क्र.१, दि. २१.७.२००३ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेले आहेत. तसेच वाचा येथील क्र.२, दि.७.९.२०१२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व संबंधितांना पुनश्च: सुचना दिलेल्या आहेत. अशाप्रकारे सूचना देऊनसुध्दा सदरहू प्रतिनियुक्ती धोरणाचे काटेकोर पालन होत नसल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. सबब, या परिपत्रकान्वये निर्देशित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्या अंतर्गत सर्व विभागीय मंडळांतील (म्हाडा) पदांवर अन्य विभागातून/मंडळातून /प्राधिकरणातून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्या गृहनिर्माण विभागाच्या पूर्व मान्यतेशिवाय करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे गृहनिर्माण विभागाच्या पुर्व मान्यतेशिवाय प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेल्या अधिकारी-कर्मचारी यांना म्हाडाच्या पदांवर रुजू करुन घेण्यात येऊ नये.

तसेच, म्हाडाच्या अधिकारी-कर्मचारी यांची अन्य विभागामध्ये /मंडळामध्ये/प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यापूर्वी अथवा कार्यमुक्त करण्यापूर्वी गृहनिर्माण विभागाची मान्यता घेण्यात यावी.

वरील निर्देशांचे पालन न केल्यास संबंधितांना व्यक्तीशः जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७१९१३०२४२५८०९ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मुं. उ. भरोसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०००३२
३) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
६) मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
७) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
८) सर्व मुख्य अधिकारी, मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ
९) सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०) निवडनस्ती, गृनिभू कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२